पुण्य नगरी
नगरी
शुक्रवार, १७ जानेवारी २०२५

# 'विवेकानंद'च्या विद्यार्थ्यांची कृषी महाविद्यालयास भेट

कोल्हापूर : विवेकानंद कॉलेजमधील बी.एस्सी. भाग ३ बॉटनी (वनस्पतीशास्त्र) विभागातील विद्यार्थ्यांनी विविध कृषी विभागांची माहिती घेण्यासाठी कृषी महाविद्यालयास भेट दिली. ही भेट विवेकानंद कॉलेज व एलेक्झिट इन्ग्रेडिएंटस्, कोल्हापूर यांच्या सहकार्याने आयोजित करण्यात आली होती. या भेटीअंतर्गत तेथील अधिकारी डॉ. कारंडे, डॉ. सरवदे, डॉ. पतंगे व डॉ. पाटील व त्यांच्या विभागातील विद्यार्थ्यांनी जैविक खतनिर्मिती, गांडूळ खतनिर्मिती, डेअरी प्रॉडक्ट तसेच फळांपासून निर्माण केलेले विविध पदार्थ व त्यांची पाककृती याबद्दल माहिती विवेकानंद कॉलेजच्या विद्यार्थ्यांना दिली. प्रा. डॉ. अभिजित कासारकर यांनी या भेटीचे आयोजन केले होते. या भेटीसाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार, वनस्पतीशास्त्र विभागप्रमुख डॉ. बी. टी. दांगट, रजिस्ट्रार आर. बी. जोग यांचे मार्गदर्शन लाभले.

सकाळ

शुक्रवार, १७ जानेवारी २०२५

# यशासाठी मनाची एकाग्रता आवश्यक : स्वामी बुद्धानंद

कोल्हापूर, ता. १६ : 'जीवनात यशप्राप्ती करण्यासाठी मनाची एकाग्रता आवश्यक आहे. मनाला एकाग्र करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. तसेच आजच्या धकाधकीच्या जीवनात ध्यानयोग साधना करा. चांगली संगत, पुस्तके, चांगल्या विषयांवरील चर्चा या गोष्टींना जीवनात स्थान द्या. सर्व प्रकारच्या प्रलोभनापासून सर्वांनी दूर राहा,'असा संदेश स्वामी बुद्धानंद यांनी दिला. विवेकानंद कॉलेजमध्ये स्वामी विवेकानंद जयंती सप्ताहनिमित्त तसेच वाचन संकल्प महाराष्ट्राचा उपक्रमांतर्गत ग्रंथालय आणि आय.क्यू.ए.सी. विभागातर्फे 'मनाची एकाग्रता' या विषयावर आयोजित व्याख्यानात ते बोलत होते. प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार अध्यक्षस्थानी होते. अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाच्या समन्वयक डॉ. श्रुती जोशी यांसह रजिस्ट्रार आर. बी. जोग, प्राध्यापक, विद्यार्थी उपस्थित होते. ग्रंथपाल डॉ. नीता पाटील यांनी प्रास्ताविक केले. सहायक ग्रंथपाल हितेंद्र साळुंखे यांनी स्वागत केले. डॉ. कैलास पाटील यांनी परिचय करून दिला. प्रा. समीक्षा फराकटे यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. दीपक तुपे यांनी आभार मानले.

पुढारी

शुक्रवार, दि. १७ जानेवारी २०२५

# 'विवेकानंद'मध्ये आज डॉ. अच्युत गोडबोले यांचे व्याख्यान

**कोल्हापूर :** विवेकानंद कॉलेज येथे श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांचा वाढदिवस ज्ञानशिदोरी दिन म्हणून साजरा होत आहे. त्यानिमित्ताने शुक्रवार (दि. १७) रोजी सकाळी १० वाजता लेखक डॉ. अच्युत गोडबोले यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे.

डॉ. गोडबोले 'माझा लेखन प्रवास आणि आजचे शिक्षण' विषयावर मार्गदर्शन करणार आहेत. याप्रसंगी संस्थेच्या सेक्रेटरी प्राचार्या शुभांगी गावडे, मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे, श्रीराम साळुंखे आदी उपस्थित राहणार आहेत. कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आवाहन प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांनी केले आहे. १

पुण्य नगरी
दि. १७.०१.२०२५

7/01/2025

# शरयूची गिर्यारोहण कॅम्पसाठी निवड

कोल्हापूर : विवेकानंद महाविद्यालयाची एनसीसी छात्र सीनिअर अंडर ऑफिसर शरयू सुतार (बी. एस्सी. कॉम्प्युटर सायन्स) हिची



जम्मू-काश्मीर येथे होणाऱ्या गिर्यारोहण आणि हिवाळी खेळ या साहसी प्रशिक्षणासाठी निवड झाली आहे. तेथे तिला बर्फातील खेळांचे प्रशिक्षण मिळणार आहे. निवडीबद्दल श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, सेक्रेटरी प्राचार्या शुभांगी गावडे, मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे, प्राचार्य डॉ. आर.आर. कुंभार यांनी अभिनंदन केले. छात्रास ६ महाराष्ट्र बटालियनचे कर्नल संधान मिश्रा, मेजर सुनीता भोसले, लेफ्टनंट जितेंद्र भरमगोंडा यांचे मार्गदर्शन लाभले.

12.1.25